Pimpri Chinchwad Police Commissionerate

# प्रेस नोट ता.०९/०७/२०२०

## वाहनांची तोडफोड करुन ओटास्किम परिसरात दशहत माजविणा-या दरोडयाच्या गुन्हयातील आरोपींना अटक

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

निगडी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर २५५/२०२० भा.द.वि.स.कलम ३९५, ४२७, आर्म ॲक्ट कलम ४ (२७), मपोका कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे दाखल गुन्हयातील महीला फिर्यादी हिचे पतीसोबत दिनांक ३०/६/२०२० रोजी झालेल्या भांडणाचे कारणावरुन दिनांक ६/७/२०२० रोजी रात्री ११.३० वा.चे सुमारास आरोपी संग्राम भोसले व इतर पाच सर्व रा. मिलींदनगर ओटास्किम निगडी यांनी लोखंडी कोयते, लोखंडी रॉड, हातोडी अशी घातक हत्यारे घेवून येवून फिर्यादीला शिवीगाळ करीत त्यांचे गळयातील ४ ग्रॅम वजनाची १६०००/- रुपये किंमतीची सोन्याची चैन जबरदस्तीने हिसकावुन नेवुन सदर परिसरात दहशत पसरविणेसाठी पार्कींग केलेल्या चारचाकी वाहनांची तोडफोड करुन नुकसान केले.फिर्यादी यांचे फिर्यादीवरुन दिनांक ७/७/२०२० रोजी वरील नमुद प्रमाणे गुन्हा दाखल झाल्याने सदर गुन्हयाचा गुन्हे शाखा युनिट २ कडूनवरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री उत्तम तांगडे यांचे मार्गदर्शनाखाली समांतर तपास सुरु करण्यात आला. त्यामध्ये पोलीस नाईक जमीर तांबोळी यांना त्यांचे गोपनीय बातमीदाराकरवी मिळाले बातमीवरुन पोलीस उप निरीक्षक एस डी निलपत्रेवार यांनी सहा.पोलीस फौजदार संपत निकम, पोलीस हवालदार दिपक खरात, पोलीस नाईक चेतन मुंढे व जमीर तांबोळी यांचे खास पथक ओटास्किम परिसरात नेमुन आरोपींची शोध मोहीम राबविली असता सदर गुन्हयातील आरोपी विकी उर्फ विकास शिवाजी लष्करे वय २३ वर्षे, धंदा- बिगारी काम रा. राजनगर, समाजमंदीर जवळ, ओटास्किम निगडी व त्याचे इतर दोन विधीसंघर्षीत साथीदारअशा तिघांना ओटास्किम परिसरातुन चोविस तासाचे आत अटक करुन गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई, अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री सुधीर हिरेमठ, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री आर आर पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट २ चे प्रभारी वरीष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे, पोलीस उप निरीक्षक संयज निलपत्रेवार, पोलीस कर्मचारी संपत निकम, पोहवा. शिवानंद स्वामी, केराप्पा माने, प्रमोद वेताळ, दिपक खरात,वसंत खोमणे, मपोहवा उषा दळे, विपुल जाधव, चेतन मुंढे, जमीर तांबोळी, जयवंत राऊत, आतिष कुडके, नामदेव राऊत, यांचे पथकाने केली आहे.